# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 01/06/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

### दुखापत

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 09 कि. मी अंतरावर मौजा निमजी खदान येथे दि. 31/05/2021 चे 13.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– जतनसिंग लक्ष्मण राठोड वय 39 वर्ष जात बंजारा रा निमजी खदान हा आपले घरी हजर असतांना घराशेजारी राहणारा ईसमाने फिर्यादीला आवाज दिला. फियादी घराबाहेर निघाला असता आरोपी नामे– हुशीयार कटोते वय 40 वर्ष, रा. निमजी खदान याने फियादीला शिवीगाळ करून "तु माझ्या चुगल्या करतो" फियादीने कोणाला चुगल्या केले त्याला बोलावुन आण असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीच्या मागील भागी डोक्याला विट मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार हिवरकर हे करीत आहे.

2) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 500 मी अंतरावर मौजा बेल्दा रोड 03 देवलापार येथे दि. 30/05/2021 चे 19.00 वा. ते 19.30 वा. दरम्यान फिर्यादी/ जखमी नामे– मनोज चुन्नीलाल पीपलवार वय 38 वर्ष रा. अमिना नगर वार्ड क्र.5 देवलापार व त्याचा भाउ असे आरोपी नामे– प्रविन उर्फ गोलु कुजिलाल वय 35 वर्ष रा.बेल्दा वार्ड क्र. 03 देवलापार याच्या घरी त्याचे जुने पैसे देण्यासाठी गेले व पैसे आरोपीच्या वडिलांना देउन घरी परत येत असता आरोपीने "तु पैसे 15 हजारच का दिले 23 हजार दयायचे होते" असे म्हणुन फिर्यादिला शिवीगाळ करून हातबुक्याने मारहाण केली. यानंतर आरोपीने फिर्यादीला रोडवर पडलेला दगड उचलुन डोक्यावर मारून जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादिचे भावाला सुध्दा ढकल ढुकल केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना राकेश नालगुडवार 9923701696 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर